पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर
नविन प्रशासकिय इमारत संकुल, प्लॉट नं. १, सेक्टर – १५
मोरेकुरण रोड, कोळगाव, नवनगर, ता. जि. पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र. २२ दिनांक १४/०३/२०२६

पालघर जिल्हा पोलीस भरती २०२४-२०२५ लेखी परीक्षा करीता बंदोबस्त तैनात.

पालघर पोलीस दलातर्फे श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२४-२५ मधील पोलीस शिपाई १५८ रिक्त पदांची भरती प्रक्रियेची दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ ते दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी दरम्यान मैदानी चाचणी पार पडली. सदर मैदानी चाचणीमध्ये लेखी परीक्षेकरीता १७८२ पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा **रविवार दिनांक १५/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता ते १२.३० वाजेदरम्यान पालघर शहरातील सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, खारेकुरण रोड, पालघर येथे पार पडणार आहे.** सदर लेखी परिक्षा ११.०० वाजता सुरु होणार असून उमेदवारांनी लेखी परिक्षा सुरु होण्याच्या दोन तास आधी परिक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

लेखी परिक्षेकरीता लांबून येणाऱ्या उमेदवारांना राहण्याची व्यवस्था करण्यात आलेली असून पुरूष उमेदवारांकरीता १) पद्मनाभ श्री. स्वामी मंदिर, टेंभोडे, पालघर (पश्चिम) ता. जि. पालघर २) उमरोळी ग्रामपंचायत हॉल, नुतन विद्यामंदिर शाळेजवळ, पालघर-बोईसर रोड, उमरोळी, ता. जि. पालघर येथे करण्यात आली असून महिला उमेदवारांकरीता लायन्स क्लब हॉल, पहिला मजला, कचेरी रोड, पालघर (पश्चिम) ता. जि. पालघर येथे करण्यात आलेली आहे.

लेखी परिक्षेकरीता विशेष बंदोबस्त :- परीक्षा शांततेत व व्यवस्थितरित्या, पारदर्शक पार पाडण्याचे दृष्टीकोनातून विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. बंदोबस्ताकरीता १ अपर पोलीस अधीक्षक, ४ उपविभागीय पोलीस अधिकारी, ११ पोलीस निरीक्षक, ५८ सपोनि/पोउपनि, २६७ पोलीस अंमलदार असा कडेकोट पोलीस बंदोबस्त असणार आहे. परिक्षा केंद्रावर एकूण ४१ खोल्या असून प्रत्येक खोलीमध्ये CCTV कॅमेऱ्याची निगराणी राहणार आहे. त्याचप्रमाणे गेटवर व इतर परिसरात ९५ CCTV कॅमेरे लावण्यात आलेले आहेत. तसेच प्रत्येक वर्गात Handicom कॅमेऱ्याची निगराणी असणार आहे. परिक्षा केंद्रावर उमेदरवारांच्या तपासणीकरीता बायोमॅट्रिक तपासणी, हजेरी पट, व्यक्तीशः तपासणी करीता १५ HHMD, ८ DFMD चा वापर केला जाणार आहे. परिक्षा केंद्रावर सुचना देण्यचासाठी ३ PA सिस्टीम बसविण्यात आलेल्या आहेत.

पोलीस शिपाई भरती लेखी परीक्षा उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना

- उमेदवाराकडे मैदानी चाचणीच्या वेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र आणि लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र अशी दोन्ही मूळ प्रवेशपत्रे असणे आवश्यक आहे.
- प्रवेशपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे स्वतःच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोंच्या किमान दोन प्रती सोबत ठेवाव्यात.
- प्रत्येक उमेदवाराची ओळख पटवण्यासाठी त्यांचे बायोमेट्रिक घेतले जाईल.
- प्रत्येक उमेदवाराचे त्याच्या रोल नंबरसह अगदी जवळून व्हिडिओ शूटिंग केले जाईल, जेणेकरून चेहरा आणि सीट क्रमांक स्पष्ट दिसेल.
- शारीरिक चाचणी दरम्यानचे व्हिडिओ शूटिंग आणि सीसीटीव्ही फुटेज तपासून उमेदवाराची खात्री केली जाईल.
- उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी काळ्या रंगाचा बॉल पॉईंट पेन आणि लेखनासाठी पॅड पोलीस दलातर्फे परीक्षा केंद्रावरच उपलब्ध करून दिले जातील. स्वतःचे पेन, पेन्सिल, खोडरबर किंवा कोणतेही लेखन साहित्य परीक्षा केंद्रावर नेण्यास पूर्णपणे प्रतिबंध करण्यात आला आहे.
- उमेदवारांना परीक्षेच्या ०२ तास आधी केंद्रावर प्रवेश दिला जाईल.
- परिक्षा केंद्रावर मोबाईल, डिजिटल डायरी, मायक्रोफोन, कॅल्क्युलेटर, ईअरफोन, डिजीटल नोट्स, स्मार्ट वॉचेस किंवा स्मार्ट आय ग्लासेस, हेअरींग एड डिव्हाइसेस असे इतर कोणतेही साहित्य ज्याचा कॉपी अथवा गैरप्रकार करण्यासाठी उपयोग होईल अशा उपकरणाला सक्त मनाई आहे. **तपासणीमध्ये असे कोणतेही उपकरण आढळून आल्यास त्या उमेदवाराला त्याच क्षणी पोलीस भरतीत अपात्र ठरवून त्याचे विरूध्द 'महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम २०२४' अन्वये तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल.**
- उमेदवारांनी परिक्षा गृहात शांतता व शिस्त राखावी तसेच परिवेक्षकांनाी दिलेल्या सुचनांचे पालन करावे तसेच उत्तर पत्रीका मध्ये नमुद केलेल्या सुचनांचे बारकाईने अवलोकन करावे. कोणताही अनुचीत प्रकार केलेला आढळून आल्यास उमेदवराला अपात्र करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
- पोलीस अधीक्षक, पालघर श्री. यतिश देशमुख यांचेतर्फे सर्व उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.